# प्रेसनोट

दि. १८/०६/२०२३

**निगडी पोलीस ठाणे येथील सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस शिपाई व खाजगी व्यक्तीवर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| गुन्हा नोंद क्रमांक | निगडी पोलीस स्टेशन, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय गुरनं ३६१/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७ अ, १२. |
| तक्रारदार | महिला, वय - ४८ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) अमोल प्रकाश कोरडे, सहायक पोलीस निरीक्षक,<br>२) सागर तुकाराम शेळके, पो.शि. २३८२,<br>दोघे नेमणुक - निगडी पो स्टे. पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय,<br>३) सुदेश शिवाजी नवले, वय ४३ वर्ष, रा. वाल्हेकरवाडी, चिंचवड, पुणे (खाजगी इसम) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १,५०,०००/- (एक लाख पन्नास हजार रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | १,५०,०००/- रुपये |
| पडताळणी दिनांक | १४/०६/२०२३, १५/०६/२०२३, १६/०६/२०२३ व दिनांक १७/०६/२०२३ |
| सापळा दिनांक | १७/०६/२०२३ |

ठिकाण :- सेक्टर नं. २७, प्राधिकरण निगडी, पुणे येथे तक्रारदार यांचे राहते घरी.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांनी त्यांचे ओळखीचे इसमास हातऊसणे व बँकेमधुन कर्ज काढून पैसे दिले होते. सदरचे बँक कर्जाचे हप्ते न भरल्यामुळे तक्रारदार यांनी त्यांचेकडे ऊसणे दिलेल्या पैशाची मागणी केली असता, त्यांनी त्यांचेविरुद्ध निगडी पोलीस स्टेशन येथे तक्रार अर्ज केला होता. सदरचा अर्ज चौकशीकामी लोकसेवक अमोल कोरडे यांचेकडे असल्याने तक्रारदार यांचेविरुद्ध खंडणीचा गुन्हा दाखल न करण्यासाठी लोकसेवक अमोल कोरडे, पोलीस शिपाई सागर शेळके व खाजगी इसम नवले यांनी १,५०,०००/- रुपये लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी केली असता, लोकसेवक स.पो.नि. कोरडे व पो.शि. शेळके यांच्यावतीने खाजगी इसम नवले यांनी १,५०,०००/- रुपयांची लाच मागणी केली व नवले यानी केलेल्या लाच मागणीस लोकसेवक कोरडे व शेळके यांनी दुजोरा देवून सहाय्य केले. लाच रक्कम नवले यानी स्विकारल्यावर तिघांना ताब्यात घेण्यात आले. त्या तिघांविरुद्ध निगडी पोलीस स्टेशन येथे आज दि. १८/०६/२०२३ रोजी वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यामध्ये तिघांना याना अटक करून मा. विशेष न्यायालय, पुणे येथे हजर केले असता, मा. न्यायालयाने दि. २०/०६/२०२३ पर्यत पोलीस कस्टडी रिमांड मंजूर केली आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस उप अधीक्षक माधुरी भोसले तपास करीत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्रीमती. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन अॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

( श्रीहरी पाटील )
सहायक पोलीस आयुक्त/ पोलीस उप अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे युनिट.